# ●...पार्वती आणि गंगा...●

पार्वती आणि गंगा।
दोघीही हिमनग दुहिता।
एक म्हणे मी बसे वामांकावरी।
दुसरी म्हणे मी शोभे मास्तकावरी ॥१॥
दोघीही शिवास ध्याती।
एक तयाची शिवशक्ती।
गंगा म्हणे मी तर।
देतसे लोका सद्गती ॥२॥
सांब सदाशिव ध्यानी रत।
कधी न पडे या वादाप्रत।
दोघींचे ही महत्व जाणे।
अर्धांगी एक, दुजी जीवनदायिनी ॥३॥
विष्णुच्या जन्हू पासुनी।
निघे गंगा भगिरथा साठी।
जटेत विसावली ती शिवाच्या।
आली तेथून गंगासागरतटी ॥४॥

हिमकन्या ती अपर्णा।
शिवासाठी तप आचरी।
निराहार राहुनी हिमाचली।
ओम नम:शिवाय वदे वैखरी ॥५॥
दोघी भगिनी श्रेष्ठ त्या असती।
ना कुणी मोठे न कुणी धाकटी।
रूप जरी वेगळे भासती।
दोन्ही शिवाच्याच शक्ती ॥६॥
...ओम नम: शिवाय...
...श्रीगुरुदेव दत्त...

**...जय गजानन माऊली...**

**...गण गण गणांत बोते...**

●●●